महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

ई-मेल.vishi१-hted@mah.gov.in दूरध्वनी क्र.०२२ २२७९३१७४

क्रमांकः- संकीर्ण-२०२६/ई-क्र. ७५९८४९/विशि-१ दिनांकः-०६.०८.२०२६

प्रति,

१. संचालक,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. संचालक, कला संचालनालय, मुंबई.

विषय :- अर्जित रजेचे रोखिकरण सुधारित वेतन संरचनेनुसार करणेबाबत.

संदर्भ :- १. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अर्जा-२०१९/प्र.क्र.१२/सेवा-६, दिनांक २४/०५/२०१९.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एडीआर-२०१८/ प्र.क्र.११०/१८ (भाग २)/तांशि-६, दि.१९.०४.२०२२.
३. संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र.उशिसं/मवि-१/अ.र.रो./२०२४ /१३५९, दि.१३.०३.२०२४

राज्य शासनाने केंद्र शासनाच्या ७ व्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीच्या आधारे दि.०१ जानेवारी, २०१६ पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचना लागू केली आहे. त्या अनुषंगाने दि.०१ जानेवारी, २०१६ रोजी व त्यानंतर सेवानिवृत्त/निधन झालेल्या/ होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या रोखिकरणाच्या परिगणनेसाठीचे वेतन हे मॅट्रीक्समधील वेतन स्तरानुसार ग्राह्य धरण्याबाबत वित्त विभागाने दि. २४ मे, २०१९ च्या शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यानुसार, अर्जित रजा रोखिकरणाची परिगणना ७ व्या वेतन आयोगानुसार करण्याबाबत शासन स्तरावरुन आदेश निर्गमित करण्याबाबत संदर्भाधिन क्र.३ च्या पत्रान्वये संचालक, उच्च शिक्षण यांनी विनंती केली आहे.

०२. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे, शासन अनुदानित अभिमत विद्यापीठे, उच्च शिक्षण संचालनालय, तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या नियंत्रणाखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालये / संस्था, तसेच सामाजिक न्याय विभागाकडून हस्तांतरीत झालेली अशासकीय अनुदानित समाजकार्य महाविद्यालये यामधील दीर्घ सुट्टी अनुज्ञेय नसलेल्या कर्मचाऱ्यांना अर्जित रजा रोखिकरणाचे लाभ ७ व्या वेतन आयोगानुसार देण्यास मान्यता देण्याबाबत वित्त विभागास विनंती करण्यात आली होती. त्यानुषंगाने वित्त विभागाने पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत:-

"दीर्घ सुट्टी विभागात कार्यरत नसलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अर्जित रजेचे रोखीकरण अनुज्ञेय आहे. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना वित्त विभाग,शासन निर्णय, दि.२४.०५.२०१९ अन्वये

सातव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतन संरचनेनुसार अर्जित रजेचे रोखीकरण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. यास्तव विभागाने उक्त टिप्पणीत नमुद केलेले संवर्ग हे शिक्षकेत्तर संवर्गात आहेत किंवा कसे यांची त्यांच्या स्तरावरून तपासणी करून योग्य ती कार्यवाही करावी."

०३. वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार उपरोक्त नमूद संस्थामधील दीर्घ सुट्टी अनुज्ञेय नसलेल्या कर्मचाऱ्यांचे ७ व्या वेतन आयोगातील सुधारित वेतन संरचनेतील वेतन विचारात घेऊन त्यांना अनुज्ञेय असलेले अर्जित रजा रोखिकरणाचे लाभ देण्यात यावेत.

(विनायक टोमके)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
३. सह सचिव (विशि), उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
४. उप सचिव (मशि), उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
५. उप सचिव (तांशि), उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
६. उप सचिव (साशि), उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई
७. निवडनस्ती (विशि-१).